# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.01.2026** **वारःशुक्रवार**

---

1. आर्थिक सर्वेक्षण संसदेत सादर, विद्यमान आर्थिक वर्षात देशाचा जीडीपी वाढीचा दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज
2. 77 व्या प्रजासत्ताक दिनाची बीटींग रिट्रीट कार्यक्रमानं सांगता; महाराष्ट्राचा चित्ररथ ठरला सर्वोत्कृष्ट
3. शैक्षणिक संस्थांमध्ये जातीआधारित भेदभाव रोखण्यासाठी यू जी सी ने तयार केलेल्या नव्या नियमावलीला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती
4. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार आणि
5. देशाच्या उत्तरेकडील राज्यांत थंडीच्या लाटेचा हवामान विभागाचा अंदाज

**<u>आर्थिक सर्वेक्षण</u>**

यंदाच्या म्हणजे 2026 या वित्तीय वर्षात देशाचा सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर 7 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे तर 2027 या वित्तीय वर्षात देशाचा विकास दर 6 पूर्णांक 8 ते 7 पूर्णांक दोन टक्क्यांदरम्यान राहण्याची शक्यता आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल संसदेत सादर केलेल्या आर्थिक सर्वेक्षणात हे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. जागतिक अनिश्चितता आणि अमेरिकेच्या शुल्क धोरणानंतरही भारतीय अर्थव्यवस्था मजबूत कामगिरी करत असल्याचं या सर्वेक्षणात नमूद केलं आहे. देशांतर्गत वाढती मागणी आणि गुंतवणूक यामुळे जीडीपी वाढीला मोठी चालना मिळत आहे. उत्पादन क्रियाकलापांचा जोर वाढला असून कृषी क्षेत्रानं स्थैर्य आणलं आहे, असं अहवालात म्हटलं आहे.

नियतकालीन श्रमशक्ती सर्वेक्षण अर्थात PLFS सुरू करण्यात आल्यापासून देशातील रोजगाराची स्थिती सुधारली आहे, असं मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांना 2025-26 च्या आर्थिक सर्वेक्षणाबद्दल माहिती देताना सांगितलं. देशाचा बेरोजगारी दर 2023-24 मधील सहा टक्क्यांवरून कमी होऊन 3 पूर्णांक 2 टक्क्यांवर आला आहे. तर श्रमशक्तीमध्ये महिलांच्या सहभागाचं प्रमाण जवळपास 18 टक्क्यांनी वाढलं आहे, अशी माहितीही नागेश्वरन यांनी यावेळी दिली. सध्याच्या जागतिक वातावरणात भारताची आर्थिक कामगिरी ओॲसिस ठरली आहे, असंही त्यांनी नमूद केलं. येत्या 1 फेब्रुवारीला केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन संसदेत अर्थसंकल्प सादर करणार आहेत. सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या देशातल्या त्या पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत.

**<u>पंतप्रधान-आर्थिक सर्वेक्षण</u>**

दरम्यान, यंदाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल हा देशात वेगानं होत असलेल्या सुधारणाचं प्रतिबिंब आहे, असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं. हा अहवाल, आव्हानात्मक जागतिक परिस्थितीतही भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीचं प्रतिबिंब असून, राष्ट्रनिर्माणातील नवोपक्रम, उद्योजकता आणि पायाभूत सुविधांची वाढती भूमिका यावर प्रकाश टाकत आहे, असंही पंतप्रधान म्हणाले.

**<u>पंतप्रधान-एआय</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराबाबत कोणतीही तडजोड केली जाऊ नये, तसंच पारदर्शक, निष्पक्ष आणि सुरक्षित असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेच्या दिशेनं काम करण्याची गरज आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात काम करणाऱ्या आघाडीच्या कंपन्या आणि संस्थांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तज्ज्ञांशी पंतप्रधानांनी काल त्यांच्या निवासस्थानी संवाद साधला. यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री जितीन प्रसाद उपस्थित होते.

**बीटींग रिट्रीट**

77 व्या प्रजासत्ताक दिनाची सांगता काल बीटींग रिट्रीट कार्यक्रमानं झाली. नवी दिल्लीतील विजय चौकात झालेल्या या दिमाखदार समारंभाला राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. या समारंभात लष्कर, नौदल, वायु सेना तसंच केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या वाद्यवृंदांनी देशभक्तीपर धून वाजवल्या.

**राज्य चित्ररथ सर्वोत्कृष्ट**

देशाच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनी दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार संचलनामध्ये सहभागी झालेल्या राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथानं प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारच्या वतीनं काल या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली. यंदा महाराष्ट्रानं 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून राज्याची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार आणि आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

**एनसीसी छात्र**

राष्ट्रीय छात्र सेनेच्या महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिला देशातील 'सर्वोत्कृष्ट छात्रा' हा सर्वोच्च बहुमान प्राप्त झाला आहे. बुधवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची 'केन' देऊन गौरविण्यात आलं. देशभरातील 17 संचालनालयांमधील 20 लाख छात्रांमधून, तनु हिनं हा बहुमान पटकावला आहे.

**यूजीसी स्थगिती**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अर्थात यू जी सीच्या  उच्च शिक्षण संस्थामध्ये समानतेस प्रोत्साहन देण्यासंबंधीच्या नव्या नियमावलीला काल सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती देत, तूर्त हे नियम लागू न करण्याचे आदेश दिले. हा स्थगिती आदेश देताना सर्वोच्च न्यायालयानं या नियमांबद्दल काही आक्षेप नोंदवत, सकृद्दर्शनी ही नियमावली सुस्पष्ट नसल्याचं आणि तिचा गैरवापर होण्याची शक्यता दिसत असल्याचं निरीक्षण नोंदवलं. या नियमावलीचा, ज्येष्ठ विधिज्ञांचा समावेश असलेल्या समितीद्वारे फेरविचार केला जावा, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती  सूर्यकांत आणि न्यायमूर्ती  जयमाल्या बागची यांच्या खंडपीठानं हा आदेश देताना सांगितलं.

**अजित पवार-निधन**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर काल बारामती इथल्या विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दोन्ही पुत्र पार्थ आणि जय पवार यांनी त्यांना मुखाग्नी दिला. यावेळी बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, रक्षा खडसे आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासह राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री,  यांच्यासह विविध पक्षांचे नेते, जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह पवार कुटुंबातील सर्व सदस्य अजितदादांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते.

**निवडणूक बदल**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल राज्य सरकारनं 3 दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे. त्या पार्श्वभूमीवर, राज्यातल्या 12 जिल्हा परिषदा आणि 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमधील निवडणुकीच्या वेळापत्रकात  राज्य निवडणूक आयोगानं बदल केला आहे. त्यानुसार आता या निवडणुकीसाठीचं मतदान 5 फेब्रुवारी ऐवजी 7 फेब्रुवारीला होईल; तर 9 फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

**ब्लॅक बॉक्स**

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य चार जणांचं बारामतीनजीक ज्या विमान अपघातात निधन झालं, त्या लियरजेट 45 या दुर्घटनाग्रस्त विमानाचा ब्लॅकबॉक्स घटनास्थळावरून हस्तगत करण्यात आला आहे. या दुर्घटनेचा वेगानं तपास सुरू असल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्यावतीनं देण्यात आली आहे.

**हुतात्मा दिन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज पुण्यतिथी आहे. हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. या निमित्ताने दिल्लीतील राजघाटावर सर्वधर्म प्रार्थना सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. हुतात्मा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**ट्रम्प-पुतीन**

यूक्रेन मधील सध्या असलेल्या कडक्याच्या थंडीच्या हवामानामुळे कीव आणि इतर यूक्रेनीयन शहरांवरील हल्ले एका आठवड्यासाठी तात्पुरते थांबवण्यास रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी सहमति दर्शवली असल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल मंत्रिमंडळ बैठकीत बोलताना सांगितलं. रशियन नेतृत्वाशी वैयक्तिक संवाद साधून हल्ले थांबवण्याची आपण विनंती केली असल्याचं ट्रम्प म्हणाले.

**केंद्र अनुदान**

15 व्या वित्त आयोगाच्या अनुदानांतर्गत, केंद्रानं महाराष्ट्र,आंध्र प्रदेश आणि त्रिपुराच्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 1 हजार 156 कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी जारी केला आहे. या निधीअंतर्गत महाराष्ट्राला 714 कोटी रुपयांपेक्षा जास्त अनुदान जारी करण्यात आलं आहे.

**छत्तीसगढ-माओवादी**

छत्तीसगढ मधील बीजापुर जिल्ह्यात काल सुरक्षा बलं आणि माओवादी यांच्यात जाहलेल्या चकमकीत 2 माओवादी ठार झाले. या माओवाद्यांकडून शस्त्रात्रं आणि दारुगोळा हस्तगत करण्यात आला.

**ऑस्ट्रेलियन खुली टेनिस स्पर्धा**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या बेलारूसच्या अरीना साबालेंकाने ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीची अंतिम फेरी गाठली आहे. अंतिम फेरीत तिचा सामना एलेना रिबाकिना हिच्याशी होणार आहे.

**हवामान**

देशाच्या उत्तरेकडील राज्यांत, विशेषकरून दिल्ली, पंजाब, हरयाणा, चंदीगढ आणि उत्तर प्रदेशांत दाट धुके आणि थंडीची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**